**MHSN060003492020**

**<u>नि.दि.दा.क्र.४१/२०२०</u>**

करमुन्नीसा अयुब बाणदार

**<u>विरुध्द</u>**

नजमुन्नीसा मुस्लीम मुजावर वगैरे

## <u>नि.क्र.१२२ वरील आदेश</u>

प्रस्तुततचा अर्ज हा प्रतिवादी क्र.१ व ३ यांनी त्यांच्या विरुध्द झालेला एकतर्फा आदेश रद्द होवुन त्यांची कैफियत अभिलेखावर दाखल करुन घेणेकरीता दाखल केला आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार, प्रतिवादी क्र.१ व ३ हे वयस्कर असुन ते वेगवेगळ्या व्याधींनी आजारी आहेत. त्यांना त्यांच्या शरीराची जास्त हालचाल करता येत नाही. त्यामुळे प्रतिवादी क्र.१ व ३ यांना वेळेत न्यायालयात हजर राहता आले नाही. म्हणुन त्यांच्या विरुध्द एकतर्फा आदेश पारीत झालेला आहे. प्रतिवादींनी जाणुनबुजून त्यांची कैफियत दाखल करणेस विलंब केलेला नाही. सबब त्यांनी त्यांच्या विरुध्द झालेला एकतर्फा आदेश रद्द होवुन त्यांची कैफियत अभिलेखावर घेणेबाबत विनंती केली आहे.

**०२.** वादीने सदर अर्जावरच त्यांचे म्हणणे सादर करुन अर्जातील मजकुर खोटा असल्याचे कथन करुन अर्ज मंजुर करावयाचा झाल्यास जास्तीत जास्त दंड आकारण्यात यावा अशी विनंती केली आहे.

**०३.** दावा हा सरस निरस मानाने तुटक वाटप होवुन कब्जा मिळणेकरीता व हक्कज्ञापनाकरीता दाखल केला आहे. प्रतिवादी क्र.१ व ३ हे दाव्याचे समन्सची बजावणी होवुन देखील ते प्रस्तुत दावेकामी हजर न झाल्याने त्यांच्याविरुध्द एकतर्फा

आदेश पारीत झालेला आहे. प्रतिवादी क्र.१ व ३ हे वयस्कर असल्याने तसेच त्यांना वेगवेगळे आजार असल्याने त्यांना मुदतीत न्यायालयात हजर राहता आले नसल्याचे कथन केले आहे. प्रतिवादी क्र.१ व ३ यांनी त्यांची कथने शपथेवर सांगितली आहेत. अर्जात नमुद कारणे विचारात घेता प्रतिवादी क्र.१ व ३ यांच्या विरुध्द झालेला एकतर्फा आदेश रद्द केल्यास वादीचे कसलेही नुकसान होणार नाही. तसेच नैसर्गिक न्यायत्वाच्या दृष्टीकोनातून प्रतिवादी क्र.१ व ३ यांना कैफियत देण्याची संधी देणे योग्य व न्यायाचे आहे. मात्र प्रतिवादी क्र.१ व ३ यांच्या विलंबामुळे झालेली गैरसोयही विचारात घेणे आवश्यक आहे. सबब, उभयतांमधील वाद अंतिमतः गुणदोषावर निकाली काढण्यासाठी प्रतिवादी क्र.१ व ३ यांचा अर्ज रक्कम रु.२००/- एकत्रीत खर्च म्हणून वादीस देण्याच्या अटीवर त्यांच्या विरुध्द झालेला एकतर्फा आदेश रद्द होवुन त्यांची कैफियत अभिलेखावर घेणे न्याय्य व योग्य आहे. सबब, खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येतो.

## आ दे श

प्रतिवादी क्र.१ व ३ यांनी वादीस रु.२००/- एकत्रीत (रुपये दोनशे मात्र) खर्च म्हणून देण्याच्या अटीवर अर्ज मंजूर करण्यात येतो.

KHULAPE VINOD VILAS Digitally signed by KHULAPE VINOD VILAS

मिरज. ( वि.वि. खुळपे )

दि.०६/०७/२०२४ सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, मिरज